**प्रेसनोट दि. ३१.०३.२०२२**

लोकसेवक विकास ऊर्फ राजू तातोबा गुरव, वय ५४ वर्षे, तलाठी, फाळकेवाडी रा. शिवपुरी रोड, कामेरी ता.वाळवा जि. सांगली वर्ग-३ यांचे विरूध्द ६,००,०००/- रूपये लाचेची मागणी केलेबाबत सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांच्या वडीलार्जीत शेतजमीनीच्या सात बारा उताऱ्यावर चुकीची नोंद झाली असून सदर चुक दुरूस्ती करून चुकीची नोंद रद्द करून देण्याकरीता लोकसेवक गुरव तलाठी, फाळकेवाडी यांनी तक्रारदार यांचेकडे सहा लाख रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०९.१२.२०२१ रोजी इकडील कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.०९.१२.२०२१, दि.१०.१२.२०२१, दि.११.१२.२०२१, दि.१७.१२.२०२१, दि.२३.१२.२०२१, दि.२४.१२.२०२१, दि.३०.१२.२०२१, दि.०३.०१.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे लोकसेवक गुरव तलाठी यांची पंचा समक्ष पडताळणी केली असता पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांचे जमीनीच्या सातबारा उताऱ्यावर झालेली चुकीची नोंद रद्द करण्यासाठी लोकसेवक गुरव यांनी तक्रारदार यांचेकडे ६,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारदार यांनी तलाठी गुरव यांचे वरिष्ठ कार्यालयास व पोलीस ठाणेस केले तक्रारी मध्ये गुरव यांची चौकशी सुरू असल्याने गुरव यांन शंका आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच स्विकारली नाही.

लोकसेवक विकास ऊर्फ राजू तातोबा गुरव, वय ५४ वर्षे, तलाठी, फाळकेवाडी रा. शिवपुरी रोड, कामेरी ता.वाळवा जि. सांगली वर्ग-३ यांचे विरुध्द इस्लामपूर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगौडा, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, श्री.गुरूदत्त मोरे तत्कालीन पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार अविनाश सागर, संजय संकपाळ, प्रितम चौगुले, अजित पाटील यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner